# शेखचिल्लीच्या कथा

शेखर शिलेदार



परी प्रकाशन

शेखचिल्ली व
हातिमताईच्या कथा

◆ ————————


© सुरक्षित

◆ ————————

प्रकाशक :
परी प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ————————

प्रमुख वितरक
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

मुखपृष्ठ :
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ————————

मुद्रक :
जयंत प्रिंटरी

◆ ————————

आवृत्ती :
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ————————

किंमत :
रुपये १२०/-

## अनुक्रमणिका

१. वय वर्षे चार ................ ३
२. म्हातारीचा गेला जीव ........ ५
३. तेल गेले आणि तूपही गेले ... ८
४. एक रुपयाचे दूध ............. ११
५. सगळी घरे देवाची ........... १४
६. रस्ते इथेच राहतात ........... १५
७. दिवास्वप्ने .................. १७
८. सासुरवाडीला प्रयाण ........ १९
९. ऐकावे जनाचे ............... २४
१०. शेरा डाकूची कैद ............ २५
११. नवा व्यापार ................ २८
१२. दिल्लीत बिल्ली ................ ३२
१३. हिरोचा रोल ................ ४२
१४. शेखचिल्लीचा राग ........... ४५
१५. भूत आणि शेखचिल्ली ...... ४७
१६. एक भेट कलकत्ता .......... ५६
१७. मूर्खांच्या गोष्टी .............. ५९
१८. मोठी थाप .................. ६१
१९. कुतुबमिनारची निर्मिती ....... ६३
२०. हुशारी अंगलट आली ....... ६४
२१. मूर्खांचे अनोखे शहर ........ ६५
२२. शेखचा पाहुणचार ......... ६९
२३. पोस्टात तेलाची बाटली ..... ७३
२४. शेखची करामत ........... ७४
२५. शेखचिल्ली चोराला पकडतो ७८
**हातिमताईच्या कथा......... ७९**

# वय वर्षे चार

भारतात हरयाना नावाचे एक प्रसिद्ध राज्य आहे. हरयाना राज्यातील एका खेड्यात शेखचिल्ली नावाचा एक बालक जन्माला आला. त्याने आपल्या मूर्खपणामुळे साऱ्या देशात नाव कमावले. अनेकांना हैराण केले. आपल्या अब्बा व अम्मीला तर नको करून सोडले.

अगदी लहानपणापासून त्याच्या मूर्खपणाच्या कारवायांनी त्याची अम्मी व अब्बा पार वैतागून गेले होते. अब्बा अनेक वेळा त्याच्यावर रागवले. चार–दोन वेळा धपाटे दिले. अम्मीने प्रेमाने समजावून सांगितले तरी त्याचा मूर्खपणा काही गेला नाही.

अशीच हैराण होऊन एक दिवस त्याची अम्मी त्याला प्रेमाने म्हणाली, ''बाळा, अरे असा मूर्खासारखा वागू नकोस. लोक नावं ठेवतात. काहीही बोलतात. त्याचे मला खूप वाईट वाटते. आता तू चार वर्षांचा झाला आहेस. म्हणजे काही अगदीच बालक नाहीस. मोठा झाला आहेस तू आता. तेव्हा मूर्खपणाने वागायचे सोड.''

''म्हणजे काय करू अम्मी ?'' त्याने भाबडेपणाने विचारले. चेहरा तर इतका बापुडवाणा केला की, त्याच्या अम्मीला त्याची दया आली.

ओढून मांडीवर घेत ती म्हणाली, ''म्हणजे शहाण्यासारखा वाग. लोक चांगले म्हणतील. शाबासकी देतील असा वाग.'' शेखचिल्लीने होय म्हणून यंत्रवत मान हलवली.

दुसऱ्याच दिवसाचा प्रसंग. काही कामानिमित्त त्याचे आई–वडील प्रवासाला निघाले होते. सोबत शेख होताच. त्यांचा रेल्वेगाडीने प्रवास चालला होता. शेख खिडकीतून पळणाऱ्या झाडांकडे पाहून म्हणाला, ''अम्मी, ती झाडे बघ कशी पळत आहेत.''

हसून अम्मी म्हणाली, ''बाळा, झाडे पळत नाहीत. आम्ही पळत आहोत.''

''हट्‌ ! तू काहीतरीच सांगते आहेस. आम्ही तर एका जाग्यावर बसलो आहोत. तुला खरं वाटत नसेल तर बघ खिडकीतून. ती बघ झाडे कशी जोरात पळत आहेत.''

अम्मी आपले म्हणणे त्याला पटवून देत होती. झाडे पळत नाहीत असे सांगत होती; पण शेख आपले म्हणणे सोडायला तयार नव्हता. त्याला वाटत होते. झाडे पळताना मला प्रत्यक्षात दिसत आहेत आणि आम्मी नाही कशी म्हणते ?

इतका वेळपर्यंत त्याचे अब्बा त्यांचे म्हणणे गप्प राहून ऐकत होते. शेवटी मिश्किलपणे हसत ते म्हणाले, ''होय रे बाळा. इकडची झाडेच विचित्र आहेत. एका जाग्यावर म्हणून थांबत नाहीत. तुझ्यासारखी धडपडी ती. पळ पळतात.'' अब्बांचे म्हणणे ऐकून त्याला बरे वाटले.

असा प्रवासाचा आनंद घेत प्रवास चालला होता. गाडी मध्ये मध्ये स्टेशनवर काही वेळ थांबत होती. प्रवासी उतरत होते. नवे चढत होते. शिटी वाजवत गाडी पुढे निघत होती. शेख फारच आनंदात होता.


काही वेळ गेला आणि तिकीट तपासनीस त्यांच्या डब्यात आला. इतर लोकांची तिकिटं तपासत त्यांच्यापर्यंत पोहोचला.

शेखच्या अब्बांनी आपले व पत्नीचे तिकीट दाखवले. ते तपासून त्याने विचारले, ''या मुलाचे तिकीट कोठे आहे ?''

''त्याचे तिकीट कसे असेल साहेब. तो फक्त तीन वर्षाचा तर आहे.''

''पण मला तो मोठा वाटतो.''

''आता मुलाचा बाप मी आहे. तो किती वर्षांचा आहे हे तुमच्यापेक्षा मला जास्त माहीत आहे.''



''पण लोक तिकीट बुडविण्यासाठी मुलाचे वय बरोबर सांगत नाहीत.''

''छे ! छे ! मी तशातला नाही. माझ्या मुलाचे वय तीनच वर्षे आहे.''

शेखच्या अब्बांनी सांगितले पण टी. सी. चे काही समाधान झाले नाही. तो संशयाने शेखकडे पाहतच होता.

शेखला आईच्या कालच्या म्हणण्याची एकदम आठवण झाली.

म्हणून तो म्हणाला, ''साहेब, अब्बा खोटे बोलत आहेत. मला चार वर्षे पूर्ण झाली असे कालच माझी अम्मी मला म्हणत होती.''

शेखचे बोलणे ऐकून त्याच्या अब्बाचा चेहरा एकदम काळा पडला. तो रागारागाने शेखकडे पाहू लागला, पण टी. सी. चा चेहरा मात्र एकदम उजळला. तो म्हणाला, ''मी म्हणत होतो. त्याचे वय जास्त आहे म्हणून.''

''तो काहीही सांगतो साहेब. त्याला काय कळतं ?''

''मुलं कधी खोटं बोलत नसतात. तो म्हणाला तेच बरोबर आहे. त्याचे वय चार वर्षे आहे. शाब्बास बाळा, असेच खरे बोलले पाहिजे. पोरगा हुशार आहे. हा खरे बोलला म्हणून मी तुम्हाला सोडतो. नाहीतर दंड ठोठावला असता.'' आणि शेखची पाठ थोपटून टी. सी. निघून गेला.

तो गेला आणि शेखने अम्मीला विचारले, ''आता तरी मी शहाण्यासारखा वागलो की नाही ? साहेबांनी मला शाबासकी दिली.''

रागवलेले त्याचे अब्बा त्याच्या कानफटात मारीत म्हणाले, ''काय मूर्ख पोरगा आहे याच्यामुळे मला अपमान सहन करावा लागला.''

गाल चोळीत शेख विचारात पडला. आपण शहाण्यासारखे वागलो म्हणून साहेबांनी शाबासकी दिली. मग अब्बा का रागावले ?

या प्रश्नाचे उत्तर शेवटपर्यंत त्याला समजले नाही.

✦✦

# म्हातारीचा गेला जीव

शेखचे अम्मी–अब्बा शेतकरी होते. ते रोज सकाळी शेतात जात व संध्याकाळी घरी येत. घरी आले की त्यांच्या शेतातील गप्पागोष्टी चालत. शेखला ऐकून वाटायचे आपण शेतात कामाला जावे पण तो लहान असल्यामुळे अब्बा–अम्मी त्याला शेतावर घेऊन जात नसत.

पण एके दिवशी अम्मी त्याला म्हणाली, ''बाळा, तू येतोस शेतावर ?''

आनंदित झालेला शेख चटकन हो म्हणाला.

अम्मीने त्याला एक खुरपं दिलं. खुरप्याने काम कसे करायचे ते सांगितले आणि म्हणाली, ''सांभाळून काम कर. वेंधळ्यासारखे काहीतरी करू नकोस.''

''तू काळजी करू नकोस अम्मी. मी बरोबर काम करतो.''

''जा मग. सांभाळून जा.''

मजेत उड्या मारीत शेख शेतात गेला.

शेत जवळच होते. तो शेतात जाऊन काम करू लागला. त्याला कामाचा आनंद वाटू लागला. बराच वेळ त्याने काम केले. मग त्याला जोराची भूक लागली. भुकेची जाणीव होताच खुरपे तेथेच टाकून तो धावत घरी आला. म्हणाला, ''अम्मी, खूप जोरात भूक लागली आहे. जेवण वाढ.''

''मला माहीत होते तुला जोराची भूक लागणार म्हणून. चल, हात पाय धू. तुला जेवण वाढते. आज तुझ्या आवडीचा शीरखुर्मा केला आहे.''

''शीरखुर्मा. अरे वा !'' आनंदाने उडी मारून तो मोरीत पळाला.

अम्मीने वाढलेले जेवण आज त्याला खूपच चविष्ट लागले. म्हणून त्याने विचारले, ''अम्मी, आज जेवण फारच चविष्ट बनविले आहेस. मी शेतावर कामाला गेलो म्हणून की काय ?''

''मी रोजच्यासारखेच बनविले आहे, पण तू आज शेतात कामाला गेलास म्हणून चविष्ट लागले आहे.''

''म्हणजे, शेतात कामाला गेलं की जेवण चविष्ट लागते ?''

''होय. कारण दिवसभर शेतात काम केल्यावर कडकडून भूक लागते आणि कडकडून भूक लागली की साधे जेवणसुद्धा चविष्ट वाटते.''

''हो. मग मी रोजच शेतात येईन. खूप काम करीन.'' जेवता जेवता तो म्हणाला.

जेवण झाल्यावर त्याच्या लक्षात आले. आपण खुरपे शेतातच विसरून आलो आहे. खुरपे आणण्यासाठी म्हणून तो शेतात गेला. खुरपे उन्हात होते. उचलायला हात घातला तेव्हा खुरपे तापले आहे हे त्याच्या लक्षात आले. तो मनात म्हणाला, 'खुरप्याला बराच ताप भरला आहे. अंग केवढे गरम लागत आहे ! याला हकीमाकडे नेले पाहिजे.' असा विचार करून तो हकीमाकडे आला. म्हणाला, ''हे खुरपे खूप वेळ उन्हात राहिल्याने त्याला ताप चढला आहे. तपासून जरा औषध द्या.''

हकीमाला वाटले, शेखचा हा पोरखेळ चालला आहे. म्हणून तो मस्करीने म्हणाला, ''खुरप्याला ताप आहे ना ? मग उपाय फारच सोपा आहे.''

''मग करा ना !''

''तूच कर.''

''मी काय हकीम आहे ?''

''मी तुला तापाचा हकीम बनवतो.''

हसून त्याच्याकडे बघत हकीम म्हणाला, ''या खुरप्याला दोरी बांध आणि विहिरीत सोड. काही वेळ विहिरीतील पाण्यात बुडवून ठेवलेस की ताप निघून जाईल.''

ताप काढायचा इतका सोपा उपाय ऐकून शेख धावतच विहिरीवर आला. दोरीला खुरपे बांधून त्याने विहिरीत सोडले. काही वेळ पाण्यात ठेवून वर काढले. पाहतो तर खुरपे थंड झाले होते.

आपण तापाचे हकीम झालो याचा त्याला पराकोटीचा आनंद झाला. आता गावात कुणालाही ताप आला तर आपणच इलाज करू असेही त्याने ठरविले.

ती संधी लवकरच चालून आली. त्याच्या शेजारची एक म्हातारी आजारी पडली. तिला ताप भरला होता. तापाने म्हातारी फणफणत होती. लवकरात लवकर हकीमाकडे नाही नेली तर काही शाश्वती नव्हती. म्हणून घरातील लोक तिला हकीमाकडे नेण्याची तयारी करू लागले.

पाळण्यात बसवून चार लोकांनी उचलून न्यावे लागणार होते. म्हणून घरातील लोक चार धडधाकट माणसे शोधू लागली.

इतक्यात शेख तिथे पोहोचला. तो म्हणाला, ''हकीमाकडे जाऊन वेळ मात्र वाया जाईल. त्यापेक्षा तिला विहिरीच्या पाण्यात चार डुबकी लावा. म्हातारी चटकन बरी होईल.''

''हे तुला रे कसे माहीत ?''

''हकीमानेच सांगितले मला. आता जरी तुम्ही म्हातारीला त्याच्याकडे नेले तरी तो हेच सांगणार. त्यात वेळ मात्र वाया जाईल. त्यापेक्षा इथेच तिला उपाय करा. मी सांगतो तो जालीम उपाय आहे. मी सुद्धा एकदा करून पाहिला आहे.''



एक तर पाळणा उचलायला चार धट्टीकट्टी माणसे मिळणे कठीण होते आणि शेखचिल्ली इतक्या आत्मविश्वासाने सांगतो तर खरेच असेल म्हणून घरच्या लोकांनी तो उपाय करायचा ठरविले.

एका मोठ्या पाटावर म्हातारीला बसविले. दोरी बांधून पाट हळूहळू विहिरीत सोडला. पाण्यात चार डुबक्या दिल्या.

शेख म्हणाला, ''आता वर ओढा. बघा, म्हातारीचा ताप निघून गेला असेल.''

त्याप्रमाणे तिला वर काढले. काठावर पोहोचताच घाईघाईत शेखने म्हातारीला हात लावला. अंग थंड लागत होते. आनंदून तो म्हणाला, ''बघा, मी सांगत नव्हतो. म्हातारीचा ताप गेला. तिचे अंग आता थंड आहे.''

म्हातारीला वर काढले, पण तिची काही हालचाल दिसेना म्हणून घरातील एका माणसाने अंगाला हात लावून पाहिले. त्याच्या लक्षात आले. म्हातारी मेली आहे. चवताळून तो शेखच्या अंगावर धावून जात म्हणाला, ''मेल्या, म्हातारीचा ताप नव्हे, जीव गेला आहे. म्हणून तिचे अंग थंड आहे.''

''असे कसे होईल ? हकीम चुकीचा उपाय कसा सांगेल ?''

''अरे फसव्या, खोटारड्या....'' अशा शिव्या देत सगळेच त्याच्या मागे लागले. एकदोघांनी चार दोन धपाटे घातले. धपाट्यांनी त्याचा जीव कळवळला. वेदना मस्तकापर्यंत गेल्या होत्या. त्यांचे मारणे चालूच होते. कसा तरी त्यांच्या हातातून सुटून तो हकीमाच्या घराच्या दिशेने धावत सुटला. ओरडण्याचा आवाज ऐकून हकीम बाहेर आला. पाहतो तर शेख व त्याच्या मागून काही लोक आरडत ओरडत येत आहेत. पुढे येत त्याने विचारले, ''अरे, असे ओरडता ते झाले तरी काय?''

''काय झाले ! तुम्ही जो उपाय सांगितला तो आम्ही केला. त्यामुळे आमची म्हातारी गेली.''

''कसला उपाय ? कुणाला सांगितला ?''

''ताप आला की विहिरीत बुडविले म्हणजे ताप निघून जातो असे आपण मला सांगितले नाही?'' रडतच शेखने विचारले आणि हकीमाने आपल्या कपाळावर हात मारून घेतला.

शेखचा तो किस्सा लोकांना सांगून हकीम म्हणाला, ''हा शेख एकदम मूर्ख आहे. त्याचे म्हणणे ऐकून तुम्ही इलाज केलातच कसा? अरे मूर्खा, माणसाला औषध दिले तरच तो बरा होईल. विहिरीत बुडवून नव्हे.''

या एका प्रसंगाने शेखचिल्ली गावात एकदम प्रसिद्ध झाला.

✦✦

## तेल गेले आणि तूपही गेले

आपला मुलगा मूर्खपणा करून अनेक वेळा आपल्याला फशी पाडतो हे अम्मीला माहीत होते. त्यामुळे ती त्याला जबाबदारीचे कसलेच काम सांगत नसे.

पण एक दिवस स्वयंपाक करताना तेल संपल्याने तिला कळून आले. दुकानावर जाऊन तेल घेऊन यायचे म्हटले तर तेवढा वेळ तिच्याजवळ नव्हता. म्हणून तिने शेखला हाक मारली. बाहेर काहीतरी करणारा शेख घरात आला. त्याने अम्मीला विचारले, ''मला का बोलावलीस ?''

‘‘जरा दुकानावर जातोस का ?’’

‘‘का ?’’

‘‘तेल आणायचे होते.’’

‘‘हो. जातो की, त्यात काय आहे ?’’

पन्नास पैसे आणि पेला त्याच्याकडे देऊन ती म्हणाली, ‘‘पन्नास पैशांचे तेल घेऊन ये. मात्र वाटेत कोठे सांडशील. सांभाळून ये.’’

‘‘त्याची तू चिंता करू नकोस.’’ असे म्हणून उड्या मारीतच तो दुकानावर आला. त्याच्या मूर्खपणाच्या कथा दुकानदाराच्या पण कानावर होत्या. म्हणून दुकानदाराने विचारले, ‘‘काय रे, काय पाहिजे ?’’

‘‘पन्नास पैशांचे तेल पाहिजे.’’

‘‘पैसे आणलेस ना ?’’

‘‘हे काय ?’’ आपल्या मुठीतील पन्नास पैशांचे नाणे दुकानदाराकडे देत तो म्हणाला.

‘‘आणि तेल कशात देऊ ?’’ दुकानदाराने विचारताच त्याने पेला पुढे केला.

दुकानदाराने पेला घेतला. त्याच्यात तेल ओतले पण थोड्याच तेलाने पेला भरला. ‘‘अरे, हा पेला भरला. अजून वीस पैशांचे तेल बाकी आहे. त्यासाठी दुसरे भांडे लागेल.’’

‘‘दुसरे भांडे आता कुठून आणणार ?’’



''मग काय उरलेले वीस पैसे परत देऊ ?''

''नको नको. अम्मीने पन्नास पैशांचेच तेल आणायला सांगितले आहे.''

''मग दुसरे भांडे घेऊन ये.''

परत घरी जाऊन दुसरे भांडे आणायचे त्याच्या जिवावर आले. आता काय करावे बरे ? वीस पैशांचे तेल कशातून न्यावे ? तो विचार करू लागला. विचार करता करता त्याच्या लक्षात आले. पेल्याचा तळ खोलगट आहे. त्याच्यात उरलेले तेल घ्यावे, म्हणून पेला उलटा करीत तो म्हणाला, ''याच्यात उरलेले तेल घाला.''

पण तोपर्यंत पेल्यातील सगळे तेल जमिनीवर सांडून गेले. जमीन बाद झाली म्हणून दुकानदार ओरडला, ''मूर्खा, तेल ओतून माझी जमीन बाद केलीस. अरे अकलेच्या कांद्या, पेला उलटा केला तर तेल सांडेल एवढेही कळत नाही ! आता उरलेले तेल तरी व्यवस्थित घरी ने. आण तो पेला इकडे.'' दुकानदारही मूर्खच. त्याने उलट्या केलेल्या पेल्याच्या तळवटीत उरलेले तेल दिले.

उलटा पेला धरून शेख घरी आला. पेला उलटा धरलेला पाहून अम्मीच्या काळजात धस्स झाले. तिने विचारले, ''पेला उलटा का धरला आहेस ?''

''दुकानदाराने उरलेलं तेल तळवटीच्या खोलगट भागात दिले. तीस पैशाच्या तेलाने पेला भरला. मग काय करणार ? म्हणून वीस पैशांचे तेल तळवटीच्या भागात घेतले.''

''म्हणजे तीस पैशांचे पेल्यातील तेल ओतून टाकलेस तर ?'' रागवून अम्मी म्हणाली.

अगदी शहाण्यासारखा शेख म्हणाला, ''छे छे, तेल ओतायला मी काय मूर्ख आहे. हा बघ भरलेला पेला.'' असे म्हणून त्याने पेला परत उलटा केला, तेव्हा तळवटीच्या भागातले तेलही जमिनीवर सांडले.

''अरे मूर्खा, तेही तेल ओतून टाकलेस. खरंच रे तू मूर्ख पोर आहेस. तुझ्यासारखा मूर्ख पोर जन्मात बघितला नाही मी.''

''अम्मी, तू कशाला रागवतेस माझ्यावर ? मी काय केले ?''

''तू काहीच केले नाहीस. मेल्या, तू धांदरट तो धांदरट.''

''अगं, पण माझी चूक काय ते तरी सांग.'' शेखचिल्लीने विचारले आणि अम्मी आणखी खवळली. एवढे रामायण घडूनही तो आपली चूक काय म्हणून विचारतो. तिला वाटले एक धपाटा घालावा पाठीत.

पण त्याचा चेहरा इतका निरागस होता की, धपाटा घालण्याचा मोह तिने आवरला.

''माझी काहीच चूक नसताना तू मला का फाडफाड बोलते आहेस ?''

''नाही. तुझी चूक काहीच नाही. चूक माझीच. तुझ्यासारखा मूर्ख पोर जन्माला घातला ही माझीच चूक.''